पुढारी | ४
सोमवार, २ मार्च २०२६

# 'विवेकानंद'मध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अभिवाचन उपक्रमास प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अभिवाचन उपक्रम राबवण्यात आला. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. ऋषिकेश डोंगरे याने वि. स. खांडेकर यांच्या 'पहिले प्रेम' या कादंबरीतील अंश सादर केला. यावेळी मराठी भाषेचे महत्त्व, मराठी भाषा संवर्धनाची गरज व मराठीचा अभिमान याबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. भक्ती पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रोहिणी रेळेकर यांनी आभार मानले.

पुण्य नगरी ▮ सोमवार, २ मार्च २०२६

# 'विवेकानंद'मध्ये मराठी भाषा गौरव दिन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अभिवाचन उपक्रम राबवण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. विद्यार्थ्यांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. महाविद्यालयाचा विद्यार्थी ऋषीकेश डोंगरे याने वि. स. खांडेकर यांच्या 'पहिले प्रेम' या कादंबरीतील अंश सादर केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी प्रमाण भाषा आणि बोलीभाषा या दोन्ही स्तरावर मराठी संवर्धित व्हायला हवी, तसेच मराठी संत साहित्याने जनमानसात मराठीची गोडी वाढवली असल्याचे सांगितले. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. रोहिणी रेळेकर यांनी आभार मानले, तर भक्ती पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

२ पुण्य नगरी

शुक्रवार, ६ मार्च २०२६



# तायक्वांदो स्पर्धेत श्रेया बरालेला सुवर्ण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत डी. वाय. पाटील कॉलेज, साळोखेनगर येथे झालेल्या आंतरविभागीय तायक्वांदो स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाची बी. ए. भाग-३ ची विद्यार्थिनी श्रेया विश्वास बराले हिने ४६ किलोंखालील वजनी गटात सुवर्णपदक मिळवले. या कामगिरीच्या जोरावर तिची ओडिशा येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटरयुनिव्हर्सिटी तायक्वांदो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. श्रेयाला कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी कोल्हापूर शनिवार, ७ मार्च २०२६

# 'यूपीएससी' मध्ये कोल्हापूरचा डंका

## सेल्फ स्टडीवर भर दिल्यानेच यश



हर्षवर्धन पाटील तुरुकवाडीचे (ता. शाहूवाडी) आहेत. त्यांचे एकत्रित कुटुंब आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापुरातील श्रीराम हायस्कूल व माध्यमिक शिक्षण शाहू हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर विवेकानंद कॉलेजमध्ये अकरावी, बारावीचे शिक्षण घेतले. कोल्हापुरातील केआयटी कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. खासगी कंपनीत एक वर्ष नोकरी केली; परंतु यूपीएससी परीक्षेचा अभ्यास करण्याचे ध्येय ठरविले, त्यानुसार दिल्ली येथे जाऊन यूपीएससी परीक्षेच्या अभ्यास सुरू केला. पर्यायी विषयासाठी खासगी शिकवणी लावली असली, तरी स्वत:वर विश्वास ठेवून सेल्फ स्टडीवर भर दिला. स्वत:वर विश्वास ठेवून अभ्यास केला. इंग्रजी भाषा येईल की नाही, असा न्यूनगंड न बाळगता अभ्यास करीत राहिलो. त्यामुळे यश संपादन करणे शक्य झाल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक
पुण्य नगरी
। कोल्हापूर । शनिवार, ७ मार्च २०२६

# तुरुकवाडीचा सुपूत्र व उचगावची कन्या यांची यूपीएससीत गगनभरारी



**कोल्हापूर :** जिद्द, चिकाटी आणि एकत्र कुटुंबाच्या भक्कम पाठबळावर कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यातील तुरुकवाडी येथील सुपुत्र हर्षवर्धन हरिश्चंद्र पाटील यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ३४९ वी रँक मिळवून देदीप्यमान यश संपादन केले.

हर्षवर्धन यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूरच्या श्रीराम विद्यालय येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण ▸▸ पान ७ वर...

## तुरुकवाडीचा सुपूत्र...

श्री शाहू छत्रपती विद्यालय (जुना बुधवार पेठ) येथे पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी विवेकानंद कॉलेजमधून ११ वी आणि १२ वीचे शिक्षण घेतले. तांत्रिक शिक्षणाची ओढ असल्याने त्यांनी केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली.

स्पर्धा परीक्षेत उतरण्यापूर्वी त्यांनी पुण्यातील टीसीएस या नामांकित कंपनीत एक वर्ष सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून नोकरी केली; मात्र प्रशासकीय सेवेत जाऊन समाजाची सेवा करण्याचे ध्येय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते.

आईचे संस्कार आणि भावांचे भक्कम मार्गदर्शन हर्षवर्धन यांच्या या यशात त्यांच्या ४० जणांच्या मोठ्या एकत्र कुटुंबाचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे वडील प्रा. डॉ. हरिश्चंद्र पाटील हे निवृत्त प्राध्यापक आहेत, तर आई गृहिणी असून त्यांच्या संस्कारांच्या शिदोरीवरच हर्षवर्धन यांनी हे यश संपादन केले आहे. कुटुंबातील मोठ्या भावांचे मार्गदर्शन या प्रवासात दिशादर्शक ठरले. निवृत्त पॅरा कमांडो संजय पाटील यांनी घरातील १० भावंडांच्या शिक्षणासाठी अथक मेहनत घेतली, तर प्रा. अजय पाटील यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे अभ्यासाची अचूक दिशा सापडल्याचे हर्षवर्धन यांनी आवर्जून सांगितले.

महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक
पुण्य नगरी
कोल्हापूर । शनिवार, ७ मार्च २०२६



# सृष्टी कुलकर्णीची बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर :** जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी कुलकर्णी बी.बी.ए भाग-३ हिने सिल्व्हर मेडल प्राप्त केले. या कामगिरीच्या जोरावर मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बुद्धिबळ महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये आपले स्थान निश्चित करून पुढील स्पर्धेकरिता ती पात्र ठरली. यशाबद्दल सृष्टी कुलकर्णी हिला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.

## संक्षिप्त



कोल्हापूर : सृष्टी कुलकर्णीची ऑल इंडिया बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर.

# सृष्टीची ऑल इंडिया बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर :** जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी कुलकर्णीने रौप्यपदक मिळवले. तिची मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बुद्धिबळ महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली आहे. तिला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी
कोल्हापूर, गुरुवार, १२ मार्च २०२६

# मुक्त विद्यापीठाच्या वतीने उद्या रोजगार मेळावा

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्र कोल्हापूर, विवेकानंद महाविद्यालय आणि युवाशक्ती फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी विवेकानंद महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संयुक्त उपक्रमांद्वारे हजारो विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्ये, उद्योग अनुभव व करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. पात्र विद्यार्थ्यांना ३० हजार रुपयांपर्यंतचे विद्यावेतन प्रशिक्षणा दरम्यान मिळणार आहे. प्रशिक्षण काळात निवास, भोजन व वाहतुकीसंबंधी माहितीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. रोजगार मेळाव्यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. १८ ते ३५ वर्षे वयोगटातील बेरोजगार युवकांनी रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी https://forms.gle /U77MWgbTPnuwdHbx9 या लिंकवर नावनोंदणी करावी. रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्याचदिवशी नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. अशी माहिती वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार प्रा. डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी दिली.

12/3/26

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १४ मार्च २०२६

# पोलिस भरतीसाठीची लेखी परीक्षा उद्या

कोल्हापूर, ता. १३ : जिल्ह्यातील ८८ रिक्त पोलिस पदांच्या भरतीसाठी रविवारी (ता. १५) लेखी परीक्षा होत आहे. ११३५ उमेदवार परीक्षा देणार आहेत. उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी केले आहे.

ही लेखी परीक्षा ताराबाई पार्क येथील स्वामी विवेकानंद कॉलेज व ज्युनिअर कॉलेजमध्ये सकाळी अकरा ते दुपारी साडेबारादरम्यान होणार आहे. शारीरिक चाचणी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ११३५ उमेदवारांसाठी ही परीक्षा होत आहे. कॉलेजच्या मुख्य इमारतीत ११ खोल्या असून त्या ठिकाणी ३०१ विद्यार्थी, तर ज्युनिअर कॉलेजच्या इमारतीमध्ये १८ खोल्या आहेत. तेथे ८३४ विद्यार्थ्यांसाठी बैठक व्यवस्था केली आहे. परीक्षा हॉलमध्ये विद्यार्थ्यांकडे मोबाईल हॅण्डसेट, इलेक्ट्रॉनिक उपकरणांना परवानगी नाही. उमेदवारांचे ओळखपत्र, प्रवेश पत्रक, हॉल तिकीट पाहूनच प्रवेश दिला जाईल. अत्याधुनिक तंत्रज्ञानासह पोलिस अधिकारी व अंमलदार यांचा बंदोबस्त असणार आहे. परीक्षा निष्पक्षपाती व पारदर्शक असणार आहे. कोणत्याही उमेदवाराने आमिषाला किंवा प्रलोभनाला बळी पडू नये, असा कोणताही प्रकार घडल्यास संबंधितांनी पोलिस उपअधीक्षक (गृह) तानाजी सावंत, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्याशी किंवा ११२ या पोलिसांच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक योगशकुमार गुप्ता यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

पुण्य नगरी 15/03/2026

# यूपीएससी परीक्षेत हर्षवर्धन पाटील याचे देदीप्यमान यश

## यशाबद्दल तुरुकवाडीत फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा

**कोकरूड : प्रतापराव शिंदे**

अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर तुरुकवाडी पैकी शाहीरवाडी (ता. शाहूवाडी) गावचे सुपुत्र कु. हर्षवर्धन हरिश्चंद्र पाटील याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ३४९ वी रँक मिळवून शाहीरवाडी गावासह संपूर्ण शाहूवाडी तालुक्याला अभिमान वाटेल असे देदीप्यमान यश मिळवले आहे. छोट्याशा गावातील युवकाने मिळवलेल्या यशामुळे शाहूवाडी तालुक्यासह तुरुकवाडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### निकाल जाहीर होताच तुरुकवाडी गावात फटाके वाजवून आनंदोत्सव

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. दरम्यान, शाहूवाडी तालुक्यातील तुरुकवाडी पैकी शाहीरवाडी गावातील सुपुत्र हर्षवर्धन पाटील याने यश मिळवल्याचे समजताच शाहीरवाडी व तुरुकवाडी गावातील युवकांनी फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी हर्षवर्धन हा केरळमध्ये बहीण हर्षदा व दाजी संदेश सावंत यांच्याकडे होता. यूपीएससी परीक्षेत हर्षवर्धनने घवघवीत यश मिळवल्याबद्दल अनेकांनी फोन करून त्याचे अभिनंदन केले. निकाल समजल्यानंतर पाटील कुटुंबाने साखर-पेढे वाटून आनंद साजरा केला.

हर्षवर्धन याचे प्राथमिक शिक्षण श्रीराम विद्यालय सजारामपुरी कोल्हापूर येथे, माध्यमिक शिक्षण राजश्री शाहू विद्यालय जुना बुधवार पेठ, कोल्हापूर, ज्युनिअर कॉलेज विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तर बी. ई. मेकॅनिकल ही पदवी केआयटी कोल्हापूर येथे पूर्ण केली. त्यानंतर पुणे येथील टीसीएस कंपनीमध्ये एक वर्ष नोकरी केली. दरम्यान, सन २०२२ ला स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी दिल्ली येथे गेले. आणि येथे अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या यूपीएससीच्या परीक्षेत दोनवेळा अपयश आले; मात्र न खचता सातत्यपूर्ण अभ्यास करून तिसऱ्या प्रयत्नात ३४९ वी रँक मिळवत हे अवघड यश खेचून आणले. त्याच्या या देदीप्यमान यशामध्ये सध्या विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे पदव्युत्तर भूमाहितीशास्त्र व भूगोल विभागात समन्वयक म्हणून काम पाहात असलेले प्रा. हरिश्चंद्र पाटील, आई सौ. जयश्री पाटील, कोकरूड गावचे सुपुत्र आयएएस आनंद पाटील, धन्वंतरी हॉस्पिटलचे डॉ. एस. एन. पाटील, संजय पाटील, डॉ. अजय पाटील, अजित कुंडले-पाटील, संदेश सावंत, धनंजय पाटील, अभय पाटील, विजय राठोड यांच्यासह हर्षवर्धन पाटील यांचे दिल्ली येथील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. हर्षवर्धनने अपयश आले तरी धैर्याने मिळवलेले यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

### वारणा खोऱ्यातील युवकांची स्पर्धा परीक्षेत दमदार कामगिरी!

शिराळा व शाहूवाडी तालुक्याच्या पश्चिम भागातील अनेक गावांतील युवकांनी गेल्या काही वर्षांपासून यूपीएससी, एमपीएससी तसेच अन्य स्पर्धा परीक्षांमधून चमकदार कामगिरी करत आपल्या कुटुंबासह गावचे, तालुक्याचे नाव उज्ज्वल करत आहेत. याचा संपूर्ण वारणा व काणसा खोऱ्यातील नागरिकांना अभिमान आहे. यामध्ये नेर्लेचे पानिपतकार विश्वास पाटील, कोकरूड गावचे सुपुत्र आनंद पाटील, विश्वास नांगरे, प्रा. गजानन घोडे-पाटील, अर्जुन सूर्यवंशी, विनायक टोमके, प्रदीप पाटील, शारदा दळवी, अर्जुन घोडे-पाटील, चरणचे डॉ. राहुल वाघमारे, सोंडोलीचे उत्तमकुमार पाटील, सरूडचे सुगंध कुमार चौगले, पी. आर. पाटील, हारुगडेवाडीचे संजय अस्वले, विजय लगारे, भेडसगावचे धीरज पाटील, नेर्लेचे पाटील, मांगरूळचे फत्तेसिंगराव पाटील, प्रकाश आढाव, दीपक कांबळे, अभिजित कुंभार, नम्रता मस्के, अर्जुन मोहिते, श्रद्धा मस्के, रिळे येथील राजाराम भाकरे, तुरुकवाडी -पाटीलवाडीचे श्रीधर पाटील, नीलेश पाटील, कोतोलीचे शिवाजी सुतार, लता सुतार, बिळाशी गावातील अश्विनी कुलकर्णी-भिडे, सुनील वारे, राहुल पाटील, फुफिरेचे मारुती गायकवाड, पावलेवाडीचे शिवराज पाटील, दुरंदेवाडी येथील अलका खोत आदींसह अनेक गावांतील युवक आणि युवती विविध स्पर्धा परीक्षेत आपले वर्चस्व सिद्ध करून प्रशासकीय सेवेत चांगली कामगिरी करताना दिसत आहेत. यांच्याच पावलावर पाऊल ठेवून तुरुकवाडी पैकी शाहीरवाडी या छोट्याशा गावातील हर्षवर्धन पाटील या युवकानेही जिद्द आणि चिकाटीने यूपीएससी परीक्षेत यश मिळवून यशाची परंपरा पुढे सुरू ठेवली आहे.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● सोमवार, दि. १६ मार्च २०२६

# प्रा. सविता रोटे यांना पीएच. डी

कोल्हापूर : येथील सहा. प्रा. सविता प्रशांत रोटे यांनी



शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून पीएच. डी पदवी संपादन केली. त्यांनी 'ग्रामीण कादंबरीतील पाऊस' या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. या संशोधनासाठी विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथील प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिवाजी विद्यापीठाचे मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, महावीर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील व प्रशांत रोटे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

पुण्य नगरी ▮ गुरुवार, १९ मार्च २०२६


**|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ||**



शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे

**" शिक्षणामुळे शील बनते.
मानसिक शक्ती वाढते.
बुध्दी चौफेर
व विशाल बनते."**

– शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

गुढीपाडव्याच्या व
भारतीय नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

मुख्य कार्यालय: २१३०,ई,ताराबाई पार्क,कोल्हापूर.फोन: २६५४६५३

**गेली ७० वर्षे बालवाडीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात नेहमीच सहभागी असणारी अग्रेसर शिक्षण संस्था**

**महाराष्ट्र आणि कर्नाटकात विविध ४१० संस्कृती केंद्रांद्वारे कार्यरत**

| | | |
|---|---|---|
| प्राचार्य अभयकुमार साळुंखे<br>कार्याध्यक्ष | शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,<br>सर्व गुरुदेव कार्यकर्ते | प्राचार्या सौ.शुभांगी गावडे<br>सचिवा |

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाकळे

# माझ्या यशात विवेकानंद कॉलेजचा सिंहाचा वाटा - हर्षवर्धन पाटील

## परीक्षेत ३४९ वा क्रमांक; कोल्हापुरात सत्कार सोहळा उत्साहात

कोल्हापूर प्रतिनिधी :
दैनिक महाभारत

जिद्द, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर यश मिळविता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण ठरलेला विवेकानंद कॉलेजचा माजी विद्यार्थी हर्षवर्धन पाटील याने केंद्रीय लोकसेवा आयोग (णझडउ) परीक्षेत ३४९ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांच्या वतीने त्याचा भव्य सत्कार करण्यात आला.



विवेकानंद कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यापासूनच संघर्षाची सवय लागते. येथील शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि उपलब्ध सुविधा यामुळेच मला यश मिळविता आले. माझ्या यशात विवेकानंद कॉलेजचा सिंहाचा वाटा आहे, असे मनोगत हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचें कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. त्यांनी आपल्या भाषणात णझडउ ही देशातील अत्यंत कठीण व प्रतिष्ठेची परीक्षा असल्याचे सांगत, या परीक्षेत यश मिळविण्यासाठी बुद्धिमत्ता सोबतच दृढ निश्चय, स्वयंशिस्त आणि अथक परिश्रम आवश्यक असतात. हर्षवर्धनने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेले यश निश्चितच प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार काढले. तसेच शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा अंगीकार करून हर्षवर्धनने प्रशासकीय सेवेत आपली छाप उमटवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी हर्षवर्धनचे वडील प्रा. हरिश्चंद्र पाटील यांनी आपल्या मुलाच्या शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेतला. हर्षवर्धनचे माध्यमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे, तर उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे पूर्ण झाले आहे.

कार्यक्रमात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हर्षवर्धन पाटील याच्या यशामुळे विवेकानंद कॉलेज व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला आणखी एक मानाचा तुरा मिळाला असून, विद्यार्थ्यांमध्ये नवी प्रेरणा निर्माण झाली आहे.

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाकळे
दि. 25/3/2026

# विवेकानंद कॉलेजची माजी विद्यार्थिनी कु. पल्लवी पाटील हिची कृषी उपसंचालकपदावर निवड



कोल्हापूर /प्रतिनिधी -
(दै.महाभारत)

विवेकानंद कॉलेजची माजी विद्यार्थिनी कु. पल्लवी पाटील हिची कृषी उपसंचालकपदावर निवड झाली आहे.मुख्य परीक्षेत राज्यात आठवा क्रमांक पटकावून तिने आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली.पल्लवीच्या यशाचा पाया विवेकानंद कॉलेजमधील इयत्ता अकरावी-बारावी विज्ञान शाखेतील शिक्षणात रचला गेला. स्पर्धा आणि गुणवत्ता यांचा समतोल साधण्याचे संस्कार येथे मिळाल्यामुळेच पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतरच्या पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवता आले, असे मत तिने सत्कार प्रसंगी व्यक्त केले.

सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आटपाडी तालुक्यातील हिवतड या गावातून तिच्या शिक्षणाची सुरुवात झाली. पुढे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून तिने पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

तिच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील व रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे तिला मार्गदर्शन लाभले.

यावेळी ज्युनिअर सायन्स विभागप्रमुख प्रा. मुकुंद नवले, प्रा. सौ. गीतांजली साळुंखे, प्रा. सुदर्शन शिंदे, प्रा. किशोर गुजर, प्रा. डी. आर. पंडित, प्रा. संदीप पाटील यांच्यासह सायन्स विभागातील प्राध्यापक, पालक व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, २६ मार्च २०२६

# आंतरराष्ट्रीय फिडे बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश कबनूरकर पाचवा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



नेरुळ, नवी मुंबई येथे अंजनीबाई चेस अकादमी आयोजित आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत विजयासह ८ गुणांची कमाई करत पाचवा क्रमांक पटकाविला. त्याला ८ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. रायगडच्या पारस दिलीप भोईर याने ८.५ गुणांसह अजिंक्यपद पटकाविले.

स्पर्धेत ३१३ मानांकितांसह ५२० खेळाडूनी सहभागी घेतला होता. एकूण ३ लाख रुपये आणि २५० चषक अशी पारितोषिके होती. ऋषिकेश अनुज ॲकॅडमी येथे सराव करत असून विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.